# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**बुधवार, दिनांक १९ जुलै, २०२३**

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे**

**(अ)** तारांकित प्रश्न

**(ब)** तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे

**सहकार मंत्री** : दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील **श्री.तान्हाजी मुटकुळे, वि.स.स. यांच्या "सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यात पीक कर्ज देण्यासाठी बँकेकडून जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याबाबत"** या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ३३५७६ ला दिलेल्या उत्तरातील आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** : महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या वर्षांचे वार्षिक प्रशासनिक अहवाल, लेखे व लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **श्री.कालीदास कोळंबकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र राज्यातील नगरपरिषद संवर्गातील अभियंत्यांना राज्य शासनाच्या इतर विभागांप्रमाणे वेतनश्रेणी व राजपत्रित दर्जा देऊन समानता आणणेसंदर्भात (सुनावणी घेण्याबाबत) चे पत्र स्थानिक लोकप्रतिनिधींनीव्दारे (वडाळा) दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजी प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांना देण्यात येणे, अद्यापपर्यंत सदर

मागणीवर कोणत्याही स्वरुपाची कार्यवाही न होणे, सदर प्रकरणी मा. न्यायालयाने दिनांक २८ जून, २०२२ रोजी निर्णय दिल्याप्रमाणे सुनावणी घेण्याचे निर्देश दिलेले असणे, परंतु मा. न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यात आलेले नसणे, सदर आदेशाचे पालन करून महाराष्ट्र राज्यातील नगरपरिषद संवर्गातील अभियंत्यांना राज्य शासनाच्या इतर विभागांप्रमाणे वेतनश्रेणी व राजपत्रित दर्जा देऊन समानता आणणेबाबत उचित कार्यवाही करून तातडीने सुनावणी घेण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री.प्रताप सरनाईक, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"ओवळा-माजिवडा विधानसभा मतदारसंघातील मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील हायवे नजीक प्रभाग क्र.१४ मध्ये जनतानगर झोपडपट्टी असून सुमारे १५ वर्षांपूर्वी केंद्र शासनाच्या बी.एस.यु.पी. योजनेतून झोपडपट्टीतील रहिवाश्यांना मोफत घरे देण्याची योजना महानगरपालिकेच्या माध्यमातून राबविण्यात येणे, या योजनेच्या माध्यमातून काही राजकीय पक्षांची नेते मंडळी व काही समाजकंटक गरीबांच्या घरांवर अतिक्रमण करत असल्याच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतनिधी म्हणून मला शिवसेना पदाधिकाऱ्यांकडून प्राप्त झाल्यावर व त्यासंदर्भात तत्कालिन पालकमंत्र्यांकडे तक्रारी केल्यानंतर पालकमंत्री यांनी या प्रकरणाची चौकशी करून कामाला स्थगिती देण्याचे आदेश दिलेले असणे, परंतू, बी.एस.यु.पी.च्या कामाची देखभाल करणारे महानगरपालिकेचे कंत्राट पध्दतीवर असलेले कर्मचाऱ्यांनी दिलेल्या खोट्या अहवालानुसार त्यावेळी शासनाने स्थगिती देण्यास नकार दिलेला असणे, परंतु आता या सर्व प्रकरणामध्ये खूप मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न होणे, बी.एस.यु.पी. योजनेमध्ये मूळ झोपडीधारक लाभार्थी ४५०० असून स्थानिक राजकीय पक्षांच्या नेत्यांनी महानगरपालिकेच्या कंत्राटावर असलेल्या कर्मचाऱ्यांना हाताशी धरून ६५०० इतके लाभार्थी दाखविल्याचे निष्पन्न होणे, त्यानुसार पहिल्या टप्प्यामध्ये ४७४ सदनिकांचा ताबा देण्यात येणे, त्यापैकी अर्ध्याहून अधिक लाभार्थी बोगस असल्याचे सिध्द होणे, त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची चौकशी होत असतांना ह्या ४७४ सदनिकांची देखील चौकशी होणे आवश्यक असणे, कारण मूळ झोपडीधारक अजूनही झोपड्यांमध्ये राहत असून बोगस कागदपत्रांच्या आधारे स्थानिक राजकीय पुढारी व लोकप्रतिनिधींना हाताशी धरून एका घरामागे सुमारे १०-१० लाख रूपये रक्कम या समाजकंटकांनी मिळविले असल्याचे पोलिसांच्या तपासामध्ये निदर्शनास येणे, गोर-गरीबांच्या टाळूवरचे लोणी खाणाऱ्या या समाजकंटकांवर कठोर कारवाई करून मिरा-भाईंदर मधील जनतानगर येथील झोपडपट्टीतील गोर-गरीब जनतेला न्याय देण्यासाठी शासनाने या संपूर्ण प्रकरणाची चौकशी आर्थिक गुन्हे शाखेतर्फे करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) सर्वश्री. विजय वडेट्टीवार, सुभाष धोटे, सुनिल केदार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील यवतमाळ जिल्ह्याच्या झरीजामनी तालुक्याच्या मुकुटबन येथील बीएस इस्पात कंपनीतर्फे ४० हजार मेट्रिक टन कोळशाचा गैरव्यवहार करण्याचे प्रकरण आढळून आलेले असणे, पांढरकवडाच्या माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या तक्रारीच्या आधारे जिल्हा खनिकर्म अधिकारी आणि त्यांच्या गटाने मंगळवारी इस्पात कंपनीमध्ये पोहचून सदरहू कंपनीच्या परिसराची कसून पाहाणी करून कागदपत्रांची तपासणी केली असणे, रात्री उशिरापर्यंत चाललेल्या या कारवाईत तक्रारीत नमूद कोळशाचे प्रमाण आणि कंपनीत उपलब्ध कोळशाच्या साठ्यात फार मोठी तफावत आढळून आल्याची बाब उघड होणे, अभिलेख्यांची जुळणी न झाल्याने कंपनीचे व्यवस्थापकाकडे याबाबतची माहिती मागितली असता सदर गटाला ते माहिती देऊ न शकणे, जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांनी बीएस इस्पात कंपनीला याप्रकरणी नोटीस पाठवून तात्काळ उत्तर देण्यास सांगितले असणे, या ४० हजार टन कोळशाची किंमत साधारण १६ कोटी रुपये सांगण्यात येत असून बीएस इस्पात कंपनीवर ही रक्कम हडप केल्याचा आरोप असणे, याआधी यवतमाळ एलसीबी ने वणीच्या मुकूटबन रस्त्यावर दिनांक १ सप्टेंबर, २०२२ रोजी छापा टाकून बेकायदेशीरपणे कोळसा वाहतूक करणाऱ्या आठ हायवा जप्त केलेल्या असणे व सदरहू कोळसा हा याच बीएस इस्पात कंपनीचा असल्याचे उघडकीस आले असणे, याबाबतची माहिती यवतमाळचे एसपी यांच्या माध्यमातून जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्याकडे पाठविण्यात आली असल्याची माहिती प्राप्त होणे, त्याचबरोबर या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी झाल्यास बीएस इस्पात कंपनीचे असे अनेक गैरव्यवहार समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात असणे, सदर कोळसा गैरव्यवहाराची तात्काळ उच्च स्तरीय चौकशी करून दोषींना कठोर शासन करण्यासाठी शासनामार्फत अद्याप कोणतीही कारवाई करण्यात न आल्याने परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र संतापाची भावना व याबाबत शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **डॉ. जितेंद्र आव्हाड**, **सर्वश्री. अनिल देशमुख**, **कुणाल पाटील**, **विजय वडेट्टीवार**, **बाळासाहेब थोरात**, **सुनिल केदार**, **अस्लम शेख**, **प्रा. वर्षा गायकवाड**, **ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)**, **सर्वश्री. अमीन पटेल**, **अमित देशमुख**, **नाना पटोले**, **डॉ.विश्वजित कदम**, **डॉ. नितिन राऊत**, **सर्वश्री. मोहन मते**, **जयंत पाटील**, **चेतन तुपे**, **चंद्रकांत नवघरे**, **रोहित पवार**, **दिलीप मोहिते-पाटील**, **अबू आजमी**, **वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील महिला व मुलींवरील अत्याचारांत वाढ झालेली असून देशपातळीवर महाराष्ट्राचा महिला अत्याचारांत तिसरा क्रमांक असल्याची चिंताजनक माहिती माहे जुलै, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आलेली असणे, कामावर महिलांचा छळ होण्याच्या घटनांमध्ये १३९ टक्क्यांनी वाढ झालेली असणे, बलात्कार आणि अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये २१७ टक्क्यांनी वाढ झालेली असणे, बाललैंगिक गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक असणे, गत वर्षात सुमारे चार हजार महिला व मुली गायब असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आलेली असणे, गायब असलेल्या महिला मुलींना शोधण्यात आलेले नसणे, महिला, मुली व बालकांवरील अत्याचारासंदर्भात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यास प्रशासनास आलेले अपयश, सदर प्रकरणी तातडीने कारवाई करण्याची लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ४ जुलै, २०२३ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असणे, या बेपत्ता झालेल्यांमध्ये सर्वाधिक ९८ मुली व महिलांचा समावेश दिसून येणे, त्यामुळे महिला व मुली असुरक्षित आहेत हे स्पष्ट दिसून येणे, धुळे जिल्ह्यातील एकूण १७ पोलीस ठाणे अंतर्गत दिनांक १ जानेवारी ते ५ एप्रिल, २०२३ दरम्यान एकूण २८३ जणांचा विविध कारणांमुळे आकस्मिक मृत्यू झालेला असणे, त्यापैकी २६६ जणांचे वारसदार आढळून येणे तर १७ जण बेवारस असल्याची नोंद पोलीस दप्तरी झालेली असणे, याच कालावधीत २४४ जण हरवल्याच्या तक्रारी जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये करण्यात आलेल्या असणे, त्यापैकी २० जणांना शोधून काढण्यात पोलिसांना यश येणे, त्यात २ पुरुष १ महिला, ४ मुले आणि ८ मुलींचा समावेश असणे, एकूण ९८ महिला, ७७ मुली व ६८ पुरुष आणि ३३ मुले अद्यापही पोलीस दप्तरी बेपत्ता असल्याची नोंद झालेली असणे, तसेच माहे जानेवारी, २०२३ ते माहे मार्च, २०२३ या ३ महिन्यांच्या कालवधीत राज्यातील ५,६१० तरुणी व महिला बेपत्ता असल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, बेपत्ता झालेल्या महिलांमध्ये १६ ते २५ या वयोगटातील ३ हजार ५९४ तरुणींचा समावेश असणे, माहे मार्च, २०२३ मध्ये सर्वाधिक २,२०० मुली व महिला बेपत्ता झाल्यापासून बेपत्ता होण्याचे प्रमाण दिवसाला सरासरी ७० असे असणे, बेपत्ता झालेल्या मुली व महिला यांचे प्रमाण पुणे येथे अधिक असून पुण्यातून २,८५८ मुली व महिला बेपत्ता झालेल्या असणे, अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगांव येथे राहणाऱ्या व पुण्यात अभ्यास करुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत चांगले यश मिळवून अधिकारी झालेल्या दर्शना पवार यांचा मृतदेह दिनांक १८ जून, २०२३ रोजी वेल्हे पोलिस स्टेशनच्या हद्दीत आढळून येणे, पोलिसांनी याबाबत चौकशी करुन आरोपी श्री.राहुल हंडोरे याला दिनांक २२ जून, २०२३ रोजी अटक करणे, श्रीमती पवार ह्या ८ दिवसांपासून बेपत्ता झाल्यामुळे त्यांच्या कुटूंबियांनी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करणे, त्यानंतर त्यांचा मृतदेह पोलिसांना पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यातील राजगडाच्या पायथ्याजवळ कुजलेल्या अवस्थेत सापडणे, आरोपीने हत्या केल्याची कबुली पोलिसांकडे देणे, ही घटना ताजी असतांनाच दिनांक २७ जून, २०२३ रोजी सकाळी १० वाजता पुण्यात एका तरुणीवर कोयत्याने

हल्ला करुन एकतर्फी प्रेमातून तिची हत्या करण्याच्या उद्देशाने कोयता घेऊन एका तरुणाने तीच्या मागे धाऊन तीची हत्या करण्याचा प्रयत्न करणे व थोडक्यात तीची हत्या करण्यात अपयशी ठरल्याची घटना उघडकीस येणे, या हल्ल्यात तरुणी जखमी होणे मात्र दोन तरुणांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून या तरुणीची जीवघेण्या हल्ल्यातून सुटका करणे, महिला-मुलींवरील अत्याचर आणि बाललैंगिक गुन्ह्यांमध्ये दिवसेंदिवस होणारी वाढ, तसेच महिला बेपत्ता होण्याचे व एकतर्फी प्रेमातून महिलांवर हल्ले होण्याच्या वाढलेल्या घटनांमुळे राज्यातील जनतेत पसरलेले भितीचे वातावरण, राज्यातील महिलांना सुरक्षित ठेवण्यासाठी उक्त प्रकरणांचा काटेकोर तपास करून गुन्हेगारांना विनाविलंब कठोर शिक्षा होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री.अबू आजमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र राज्यातील औरंगाबाद येथे रोशनगेट येथील राम मंदिरासमोर रामनवमीच्या दिवशी दोन धार्मिक समुदायांमध्ये वाद होऊन कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न उद्‌भवला असल्याची बाब दिनांक २९ मार्च, २०२३ वा त्यासुमारास निदर्शनास येणे, सदर घडलेल्या दंगलीमध्ये पोलीस कर्मचारी याने केलेल्या गोळीबारात तेथील रहिवासी मुनिरोद्दिन शेख जो त्याच्या इमारतीच्या आवारात होता त्याला गोळी लागल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास येणे, सदर गोळीबारामध्ये मृत्यू झालेल्या व्यक्तीला पोलीस प्रशासनाने दंगलीमध्ये सहभागी असल्याची खोटी माहिती देऊन मृत व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात येणे, मृत व्यक्ती मुनिरोद्दिन शेख घटनेच्या वेळेस त्यांच्या इमारतीच्या आवारात असतांनाचे सर्व पुरावे सीसीटीव्ही फुटेजमध्ये उपलब्ध असून ते संबंधित विभागांना देण्यात येणे, सदर गोळीबार करून निर्दोष व्यक्तीला मारणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करणे तसेच मृत व्यक्तीच्या परिवारास ५० लाख रुपये नुकसान भरपाई व कुटुंबातील एका व्यक्तीस शासकीय नोकरी देण्यात येण्याची मागणी मा.उपमुख्यमंत्री, मा.पोलीस महासंचालक व संबंधित विभागाला करण्यात येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री.हरीभाऊ बागडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मराठवाडा व महाराष्ट्रातील अन्य जिल्ह्यांमध्ये माहे जून महिन्याच्या सरासरी पेक्षा खूपच कमी प्रमाणात पाऊस पडला असल्याने खरीपच्या पेरण्या झालेल्या नसणे, पेरणीची वेळ निघून गेल्याने खरीप हंगामातील कापूस, सोयाबीन, तुर, मका अशी नगदी पैशाची पिके घेता येत नसणे, काही ठिकाणी लागवड व पेरणी झाली असून त्या पिकांची

उगवण क्षमता अत्यंत कमी प्रमाणात असणे, त्यांना अपेक्षित उत्पन्न प्राप्त न होणे, त्यामुळे शेतकरी वर्गात पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच** : "मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मराठवाडा मुक्ती संग्रामातील सर्व स्वातंत्र्यसेनानींना व हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठीचा प्रस्ताव"

**सहा** : **शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ – महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२३

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१) (क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री नाना पटोले, बाळासाहेब थोरात, संजय जगताप, सुरेश वरपुडकर, अमिन पटेल, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, संग्राम थोपटे, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री बळवंत वानखडे, सुभाष धोटे, शिरीष चौधरी, कुणाल पाटील, मोहनराव हंबर्डे, रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२३ नापसंत करते."

**(ख) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.शिरीष चौधरी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अमिन पटेल, विकास ठाकरे, नाना पटोले व संजय जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) (क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.शिरीष चौधरी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अमिन पटेल, विकास ठाकरे, नाना पटोले व संजय जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** **(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री नाना पटोले, बाळासाहेब थोरात, संजय जगताप, सुरेश वरपुडकर, अमिन पटेल, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, संग्राम थोपटे, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री बळवंत वानखडे, सुभाष धोटे, शिरीष चौधरी, कुणाल पाटील, मोहनराव हंबर्डे, रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ - महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा अध्यादेश, २०२३ नापसंत करते."

**(ख) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ — महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ — महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, नाना पटोले, संजय जगताप, बळवंत वानखडे, विकास ठाकरे, शिरीष चौधरी व अमिन पटेल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ — महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ — महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(४)** **(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री नाना पटोले, बाळासाहेब थोरात, संजय जगताप, सुरेश वरपुडकर, अमिन पटेल, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, संग्राम थोपटे, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री बळवंत वानखडे, सुभाष धोटे, शिरीष चौधरी, कुणाल पाटील, मोहनराव हंबर्डे, रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ - महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे अध्यादेश, २०२३ नापसंत करते."

**(ख) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२३**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, नाना पटोले, संजय जगताप, बळवंत वानखडे, विकास ठाकरे, शिरीष चौधरी व अमिन पटेल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सात : डॉ.किरण लहामटे, सर्वश्री रणधीर सावरकर, सदा सरवणकर, बाबासाहेब पाटील, डॉ.संजय कुटे, सर्वश्री चिमणराव पाटील, दिलीप मोहिते-पाटील, जयकुमार रावल, राजेंद्र पाटणी, भरतशेठ गोगावले, प्रकाश सोळंके, अभिमन्यू पवार, राजेश पवार, संजय शिरसाठ, दत्तात्रय भरणे, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री आकाश फुंडकर, प्रताप सरनाईक, यशवंत माने, समीर कुणावार, तुषार राठोड, संजय रायमुलकर, दौलत दरोडा, हरिष पिंपळे, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री संग्राम जगताप, प्रकाश भारसाकळे, हरिभाऊ बागडे, मंगेश कुडाळकर, शेखर निकम, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, सीमा हिरे, सर्वश्री प्रकाश आबिटकर, बाळासाहेब आजबे, सर्वश्री सचिन कल्याण-शेट्टी, ज्ञानराज चौगुले, संजय गायकवाड, अॅड. शहाजीबापू पाटील, श्रीमती नमिता मुदंडा, सर्वश्री अनिल बाबर, सुहास कांदे, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, श्रीमती लताबाई सोनावणे, अॅड आशिष जयस्वाल, सर्वश्री रमेश बोरनारे, समाधान आवताडे, दादाराव केचे, जयकुमार गोरे, राम सातपुते, सुभाष देशमुख, सुरेश भोळे, किर्तीकुमार बांगडीया, प्रशांत बंब, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री संताष दानवे, विनोद अग्रवाल, प्रकाश आवाडे, रत्नाकर गुट्टे, संतोष बांगर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"अल निनोचा प्रभाव, सरासरीपेक्षा पाऊस कमी होण्याची शक्यता व उशिराने झालेले पावसाचे आगमन, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांवर दुबार वा तिबार पेरणीची वेळ येण्याची शक्यता लक्षात घेऊन शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्याची भूमिका शासनाने घेतली असणे, याबाबतच्या उपाययोजना युध्दस्तरावर करण्याची आवश्यकता असणे, राज्यातील बहुतांश लोकांचे जीवन कृषी क्षेत्राशी निगडित असल्याने शेती हे अन्नधान्य, रोजगार व उपजीविकेचे

साधन असणे, राज्यातील शेतकरी समर्थ व स्वावलंबी व्हावा, यासाठी शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेतीचे उत्पादन व शेतकऱ्यांचा आर्थिक विकास या धोरणाला विद्यमान शासनाने परमोच्च स्थान दिले असणे, शेतकरी स्वयंनिर्भर व्हावा या उद्देशाने विविध नवनव्या योजना विद्यमान शासनाने हाती घेतल्या असणे, जलसंधारणाच्या सर्वाधिक योजना यशस्वीपणे राबविण्यात महाराष्ट्र हे देशात प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले असणे, पाणी अडवून, जमिनीत जिरवणे गरजेचे असल्याने जलयुक्त शिवार योजना टप्पा २ राबवण्याचा निर्णय सरकारने घेतला असून ५४५ कोटी रुपयांची तरतूद केली असणे, अर्थसंकल्पातील "पंचामृत" संकल्पनेत "शाश्वत शेती - समृध्द शेतकरी " हे प्रथम अमृत असून त्याअनुषंगाने राज्यातील पीक विमा योजना व्यापक प्रमाणात राबविली जात असणे, कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविणे, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना पुढे सुरु ठेवणे, पशुजैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे येथे लम्पी चर्मरोग प्रतिबंधक लस निर्मिती सुरु करणे, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या उर्वरित पात्र शेतकऱ्यांना त्यांचे लाभ देणे, उत्पन्न वाढीसाठी कोकणात काजू बोंड प्रक्रिया केंद्रे स्थापन करणे, कृषी व संलग्न क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे उपयोजन व प्रसारण करण्यासाठी नागपूर येथे डॉ.पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र स्थापन करणे, नागपूर, काटोल, कळमेश्वर, बुलढाणा इ.जिल्ह्यात आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणे इ.धोरणे कार्यान्वीत करण्यात आली असणे, हळद पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी हिंगोली जिल्ह्यात "बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली असणे, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी "मिशन २०२५ "कार्यक्रम हाती घेतला असणे व त्याअंतर्गत पुढील ३ वर्षात ३० टक्के कृषी वीज वाहिन्यांचे सौरऊर्जीकरण अपेक्षित असणे, संयुक्त राष्ट्र संघाच्या घोषणेस अनुसरून राज्यात महाराष्ट्र पौष्टिक तृणधान्य अभियान राबविण्यात येणे, शेतकऱ्यांच्या घरी जाऊन गोवंश पशुधनाचे संपूर्णतः मोफत प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात येणे, नमो शेतकरी महासन्माननिधी योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या प्रति शेतकरी व प्रतिवर्षी ६ हजार रुपयात राज्य सरकारने आणखी ६ हजार रुपयांची भर घातली असणे, महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्त योजनेअंतर्गत नियमित पीक कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत राज्य शासनाकडून प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणे, पंतप्रधान पीक विमा योजनेच्या हप्त्याचा भार शेतकऱ्यांवर पडू नये, यासाठी शेतकरी हिश्याचा भार उचलण्याचा व शेतकऱ्यांना फक्त १ रुपयात पीक विमा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला असणे, शेतीच्या शाश्वत विकासासाठी महाकृषी विकास अभियान राबविण्यात येणे, "मागेल त्याला शेततळे" योजनेच्या धर्तीवर "मागेल त्याला फळबाग, ठिबक सिंचन, शेततळ्याचे अस्तरीकरण, शेडनेट, हरितगृह, आधुनिक पेरणी यंत्रे व कॉटन श्रेडर" हे घटक उपलब्ध करण्यात येणे, महाराष्ट्रातील काजूच्या सर्वंकष विकासासाठी "काजू फळपिक विकास योजना" लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतला असणे, अमरावती येथे महत्वाकांक्षी प्रधानमंत्री मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल रीजन अँड अपेरल (PM MITRA) पार्कचे लोकार्पण नुकतेच झाले असणे, विदर्भ, मराठवाड्यासह राज्यातील कापूस उत्पादकांना उत्पन्नवाढीची संधी मिळणार असणे, तसेच, या प्रकल्पामुळे राज्यात गुंतवणूक व रोजगार निर्मितीत मोठी भर

पडणार असणे, गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राज्यात राबवून अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयास २ लाख रुपयांपर्यंत सानुग्रह अनुदान देणे, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याकरिता माहिती तंत्रज्ञानाची मदत घेऊन मोबाईलद्वारे ई-पंचनामा करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणे, देशी गोवंशाचे संवर्धन, संगोपन व संरक्षण होण्याकरिता महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली असणे, या आयोगाच्या माध्यमातून "गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना" आणि "गोमाई मूल्यवर्धन योजना" या योजना राबविण्याचे प्रस्तावित असणे, राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेअंतर्गत मेंढी पालनासाठी भरीव निधीची तरतूद केली असणे, प्रकल्पबाधित मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्यासाठी व मच्छीमार कुटुंबीयांच्या कल्याणासाठी प्रकल्पाच्या २% किंवा कमाल ५ कोटी रकमेचा मत्स्य विकास कोष स्थापन करण्यात येणे, मच्छीमारांना डिझेल अनुदानासाठी असलेली यांत्रिक नौकेच्या कमाल १२० अश्वशक्तीच्या इंजिनाची मर्यादा काढल्याने सुमारे ८५ हजारापेक्षा अधिक मच्छीमारांना या योजनेचा लाभ मिळणे, केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत २७ प्रकल्पांना आणि बळीराजा जलसंजीवनी योजने अंतर्गत ९१ प्रकल्पांना मंजुरी देण्यात येणे, परिणामी अनुक्रमे ३ लाख २७ हजार हेक्टर सिंचन क्षमता आणि १ लाख ७३ हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली असणे, शेत जमिनीचा ताबा आणि मालकी हक्क मिळविताना होणारे आपापसातील वाद मिटविताना जमिनीच्या अदलाबदल दस्तावरील मुद्रांक शुल्कात कपात करून ते नाममात्र एक हजार रुपये आणि नोंदणी शुल्क एक हजार रुपये करण्यासंदर्भात "सलोखा योजना" राबविण्यात येणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि विविध विभागीय योजनांचे अभिसरण करून 'सुविधा संपन्न कुटुंब मिशन' आणि 'सर्वांगीण ग्राम संस्कृती योजना' राबविण्यात येणे, प्रशासनातील अधिकारी व पदाधिकारी यांनी संपूर्ण एक दिवस शेतकऱ्यांसोबत राहून शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी 'माझा एक दिवस, माझ्या बळीराजासाठी' हा उपक्रम राबविण्यात येणे, पूरक व्यवसाय म्हणून मोठ्याप्रमाणावर शेतकरी दूध उत्पादनाकडे वळले असणे, अशा शेतकऱ्यांच्या बाबतीत मदतीची भूमिका घेऊन शासनाने दूध दर वाढविण्याबाबत निर्णय घेतला असणे, शासनाच्या या योजनांचा तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत लाभ मिळण्यासाठी या योजना अधिक कार्यक्षम करण्याची व त्यायोगे महाराष्ट्राला अधिकाधिक समृद्धीकडे नेण्यासाठी 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या उक्तीप्रमाणे करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १८ जुलै, २०२३

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा